॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION** website: srtmun.ac.in

**Phone: (02462) 215294** **E-mail: directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२६-२७/९७४२ दिनांक : ०५/१०/२०२६

<u>परीक्षा शुल्क माफीसंबंधीचे सुधारीत परिपत्रक</u>

प्रति,
मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.संचालक, सर्व संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
मा.संचालक, उपपरिसर, लातुर, परभणी, प्रस्तुत विद्यापीठ
मा.प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ
मा.समन्वय, कै.उत्तमराव राठोड आदिवासी व विकास संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ

विषय: सन २०२६ च्या दुष्काळदृश्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्याचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.
संदर्भ: १)मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याशी झालेली दिनांक ०१/१०/२०२६ रोजीची ऑनलाईन बैठक.
२)मदत व पुनवर्सन विभाग शासन निर्णय क्र. समिती २६/प्र.क्र. ८२/मदत/२, दि. २५/०९/२०२६
३)मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुर्ण-१६ यांचे पत्र क्र. उशिंस/शिष्य-२०२६-अवर्षण-परीक्षा शुल्क-२०२६-२७/ई १३२१७१६, दि. ३०/०९/२०२६
४) जा.क्र./ससंउशिनां/शिष्य/अवर्षण-परीक्षा शुल्क -२०२६/E-3680642 दि. ०१/१०/२०२६

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भिय बैठक व शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, दि. ०१/१०/२०२६ रोजी दुपारी ठिक ४.०० वाजता मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्यासमवेत मा.कुलगुरू व इतर प्रशासकीय अधिकारी यांची ऑनलाईन बैठक पार पडली. सदर बैठकीदरम्यान मा.मंत्री महोदयांनी राज्यातील दुष्काळदृश्य परिस्थिती लक्षात घेऊन प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालये, सर्व संकुले विद्यापीठ परिसर, सर्व संकुले उपपरिसर, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, कै.उत्तमराव राठोड आदिवासी व विकास संशोधन केंद्र, किनवट या ठिकाणी पदवी, पदविका, पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत अशा नियमित परीक्षार्थीचे परीक्षा शुल्क स्वीकारण्यात येऊ नये असे ऑनलाईन बैठकीदरम्यान अवगत केले आहे.

वरील संदर्भीय पत्र क्र. ४ अन्वये कळविण्यात येते की, हिवाळी-२०२६ च्या नोव्हे./डिसें. २०२६ मध्ये घेण्यात येणा-या पदवी, पदविका व पदव्युत्तर व्यावसायिक व अव्यावसायिक नियमित अभ्यासक्रमाचे परीक्षा आवेदनपत्र भरताना संदर्भ क्र. ४ प्रमाणे २६५ तालुक्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क आकारण्यात येऊ नये.

तसेच जे परीक्षार्थी परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र आहेत अशा सर्व नियमित विद्यार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र व प्रमाणपत्रानुसार भरून प्राचार्य/संचालक यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित करून सदर प्रस्तावर विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील अधीक्षक, कला/वाणिज्य/विज्ञान यांच्याकडे सादर करावेत.

हिवाळी-२०२६ च्या परीक्षेचे परीक्षा आवेदनपत्र सादर करण्यासाठी दिनांक २९/०९/२०२६ च्या परिपत्रकान्वये दिनांक ०७/१०/२०२६ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर परिपत्रकान्वये परीक्षा आवेदनपत्र सादर करण्यासाठी पुनश्च मुदतवाढ देण्यात येत असून दिनांक १०/१०/२०२६ पर्यंत परीक्षा आवेदनपत्र स्विकारण्यात यावे.

कृपया पुढील पानावर...

महाविद्यालयांनी दिनांक १३/१०/२०२६ रोजी Online शुल्क भरावे आणि सदर परीक्षा आवेदनपत्र विद्यापीठाच्या परीक्षा विभागात खालील सुधारीत वेळापत्रकान्चे सादर करावे.

| अ.क्र. | जिल्हा | महाविद्यालय सांकेतांक क्रमांक | दिनांक | आवेदनपत्र सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. १२२ व त्यापुढील सर्व) | १४/१०/२०२६ | परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ |
| ०२ | नांदेड | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ११२-१२१) | १५/१०/२०२६ | |
| ०३ | नांदेड | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. १०१-१११) | १६/१०/२०२६ | |
| ०४ | परभणी/हिंगोली | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. २२२ व त्यापुढील सर्व) | १४/१०/२०२६ | उपपरिसर, परभणी, प्रस्तुत विद्यापीठ |
| ०५ | परभणी/हिंगोली | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. २१२-२२१) | १५/१०/२०२६ | |
| ०६ | परभणी/हिंगोली | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. २०१-२११) | १६/१०/२०२६ | |
| ०७ | लातूर | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ३२२ व त्यापुढील सर्व) | १४/१०/२०२६ | उपपरिसर, लातूर, प्रस्तुत विद्यापीठ |
| ०८ | लातूर | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ३१२-३२१) | १५/१०/२०२६ | |
| ०९ | लातूर | सर्व महाविद्यालये (सांकेतांक क्र. ३०१-३११) | १६/१०/२०२६ | |

**सोबत:** **१) विवरणपत्र 'अ'**
**२) प्रमाणपत्र**
**३) हमी पत्र**
४) Summary Sheet
५) Annexure-I

**प्र.संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव:**
मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
अधीक्षक, कला,वाणिज्य व विज्ञान शाखा, प्रस्तुत विद्यापीठ.

(१) विवरणपत्र-'अ'

**शैक्षणिक विभाग/महाविद्यालयाचे लेटर हेड**

**विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालकांचे नाव :**

**भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक :**

**ई-मेल आयडी :**

**संदर्भ क्र.:** **दि. / /२०२६**

## विवरणपत्र-अ

सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र.

| अ.क्र. | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | एकुण विद्यार्थी संख्या | एकुण प्रतिपुर्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**प्राचार्य/विभाग प्रमुख**
**नाव**
**शिक्का**

(२) प्रमाणपत्र

(शैक्षणिक विभाग/महाविद्यालयाचे लेटर हेड)

विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालकांचे नाव :

भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक :

ई-मेल आयडी :

संदर्भ क्र.: दि. / /२०२६

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील रहिवाशी आहेत. तसेच त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लक्ष मर्यादेपर्यत आहे. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफी साठी पात्र आहेत. विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १००% परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही याची खात्री केलेली आहे.

तरी दुष्काळग्रस्त भागातील एकुण विद्यार्थी संख्या ............... व रक्कम रु. ........................ एवढी आहे

करिता, प्रमाणित करण्यात येत आहे.

प्राचार्य/विभाग प्रमुख
नाव
शिक्का

(३) **हमीपत्र**

List Sr. No.:

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

# हमीपत्र

मी खाली सही करणार

विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव :______________________________

पी.आर.एन.क्रमांक :____________________ सत्र______________

अभ्यासक्रम :______________________________

आधार क्रमांक :______________________________

महाविद्यालयाचे /संस्थेचे नाव : ______________________________

परीक्षा आवेदन क्रमांक : ____________________मोबाईल क्र :______________

कायमचा निवासी पत्ता : ______________________________

गाव/शहर : ______________तालुका______________ जिल्हा ______________

**मी याव्दारे सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो/देते की :**

१. महाराष्ट्र शासनाने सन २०२६—२७ मधील दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे मदत व पुनर्वसन विभागाच्या दि. २५/०९/२०२६ रोजीच्या शासन निर्णय क्र.: समिती—२०२६/प्र.क्र.८२/मदत—२ अन्वये घोषित केलेल्या दुष्काळसदृश्य तालुक्यामध्ये माझे कुटूंब वास्तव्यास असून आम्ही तेथील मूळ रहिवासी आहोत.

२. मी, शैक्षणिक वर्ष २०२६—२७ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत होणा—या परीक्षांचे परीक्षा शुल्क माफ होण्यासाठी अर्ज सादर करत आहे.

३. मी, शैक्षणिक वर्ष २०२६—२७ करिता महाराष्ट्र शासनाच्या अथवा केंद्र शासनाच्या इतर कोणत्याही प्रकारच्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क सवलत (उदा.महाडीबीटी मार्फत मिळणारी शिष्यवृत्ती किंवा तत्सम योजना) यामधून परीक्षा फी प्रतिपूर्तीचा लाभ घेतलेला नाही व चालु शैक्षणिक वर्षात असा कोणताही लाभ मी घेणार नाही.

४. सदर हमीपत्रात दिलेली सर्व माहिती माझ्या वैयक्तिक माहिती व समजूतीनुसार पुर्णत: खरी व बिनचूक आहे. भविष्यात मी शासनाच्या इतर योजनेतून परीक्षा फीचा लाभ घेतल्याची किंवा माहिती खोटी/अयोग्य असल्याचे आढळल्यास माझ्याकडून संपूर्ण परीक्षा शुल्क दंडासह वसूल केले जाईल. तसेच माझ्याविरूध्द होणा—या प्रशासकीय कार्यवाहीस मी व्यक्तिश: जबाबदार राहील.

ठिकाण : स्वाक्षरी

दिनांक / /२०२६ विद्यार्थ्याचे नाव :______________________

---

## पालकांचे संमतीपत्र

मी श्री/श्रीमती______________________याव्दारे हमी देतो/देते की, माझा मुलगा/मुलगी __________ ______________________याने/हिने वर नमूद केलेल्या हमीपत्रातील सर्व अटी व शर्तीचे वाचन केले असून त्या मला पुर्णत: मान्य आहेत.

ठिकाण : स्वाक्षरी

दिनांक / /२०२६ विद्यार्थ्याचे नाव :______________________

---

## कार्यालयीन छाननी व पडताळणी (महाविद्यालयासाठी)

उपरोक्त नमूद विद्यार्थ्याने सादर केलेल्या माहितीची, दुष्काळसदृश्य तालुक्याच्या रहिवासी पुराव्याची आणि शिष्यवृत्ती

न घेतल्याबाबतच्या विहित अटीची पडताळणी करण्यात आली आहे. सदर विद्यार्थी परीक्षा शुल्क माफीच्या सवलतीस पात्र /अपात्र आहे.

लिपीक/तपासणी अधिकारी (स्वाक्षरी व शिक्का)

प्राचार्य/विभागप्रमुख (स्वाक्षरी व शिक्का)

(4) SUMMERY SHEET

(Department/College Letterhead)
Number of Students & Fees Summary Sheet
Refund Examination Fees of Nov./Dec., 2026 Examinations

| Sr. No. | Name of Examination | Semester | No. of Students | Total Examination Fees |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |
| 6 | | | | |
| 7 | | | | |
| 8 | | | | |
| 9 | | | | |
| 10 | | | | |
| 11 | | | | |
| 12 | | | | |
| 13 | | | | |
| 14 | | | | |
| 15 | | | | |
| Grand Total | | | | |

Seal& Sing
Principal/Head

(5) **Annexure-I**

## Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## Refund Examination Fees of Nov./Dec., 2026 Examinations

**Principal/Director Name:________________________________________________Mobile No.:______________________**

**Name College/School/Institute:_____________________________________________College/School/Institute Code:____**

| Sr. No. | Name of Student (Surname First) | P.R.N. Number | Name of Course | Semester | Village/City | Taluka | District | Exam Fee |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | |
| 7 | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | |
| 10 | | | | | | | | |

**Seal & Sing**
**Director/Principal**

महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड**

शासकीय तंत्रनिकेतनच्या पाठीमागे,आनंद नगर रोड, दत्त मंदिराशेजारी,दयानंद नगर, नांदेड ४३१६०२

| | |
|---|---|
| दुरध्वनीक्र: - ०२४६२-२८३३१४४ | Website: -https://jdhenanded.info/ |
| E-mail: jdhe.nanded@yahoo.co.in | E-mail:jdhe.nanded-mh@gov.in |


जा.क्र.ससंउशिनां/ शिष्य/अवर्षण - परीक्षा शुल्क -२०२६-२७/ E- **3680642** दि. ०१.१०.२०२६

प्रति,
कुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.

**विषय :-** सन २६ च्या खरीप हंगामातील Triger - १ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत.

संदर्भ :- १. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एफईडी - १५९२/१२०२/(११३२) साशि - ५, दि. १८.१०.१९९३.
२. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २६/प्र. क्र. ८२/ मदत /२, दि. २५.०९.२०२६
३. मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०२६ - अवर्षण - परीक्षा शुल्क-२०२६-२७/ई १३२१७१६ दि. ३०.०९.२०२६.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये, राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षामंडळे यांची परीक्षा फी माफी करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये सार्वजनिक विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे.

आता संदर्भीय शासन निर्णय क्रमांक २ नुसार, सन २०२६ च्या खरीप हंगामातील Triger - १ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ सदृष्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केली आहे.

त्यानुसार आपल्या विद्यापीठाच्या अधिनस्त संबंधित दुष्काळसदृष्य तालुक्यातील महाविद्यालयांना खालील प्रमाणे सूचना देण्यात याव्यात.

१. संदर्भ क्रमांक १ येथील १८ ऑक्टोबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृष्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदन पत्रे विद्यापीठाडे संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकीत करुन पाठवावे.

२. सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृष्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन या कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

३. तसेच विद्यापीठाने आपल्याकडे प्राप्त झालेल्या सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृष्य तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन या कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

४. विद्यापीठातील व महाविद्यालयांकडून आलेलया माहितीची तपासणी करुन आवश्यक रक्कमेची माहिती सोबतच्या विवरणपत्र - अ मध्ये सादर करावी. सदरची माहिती मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना सादर करावयाची असल्याने प्रथम प्राधान्याने देण्यात यावी.

५. कोणत्याही परिस्थितीत दुष्काळ सदृष्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**सोबत संदर्भ क्र. ०३ चे पत्र**

**(संभाजी सूर्यवंशी)**
प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण नांदेड विभाग,
नांदेड

प्रत : मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ४१२-ई, बहिरट पाटील चौक शिवाजी नगर, पुणे-४११०१६ यांना माहितीस्तव सविनय सादर.

# विवरणपत्र - अ

सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृष्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र

(रक्कम रुपयात)

| अ. क्र. | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृष्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपूर्ती साठी आवश्यक रक्कम | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृष्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपूर्ती रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

कुलसचिव